# कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन

## ( नव्वदोत्तरी साहित्याच्या विशेष संदर्भात )

## प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख सेवा गौरव ग्रंथ



संपादन

प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी | डॉ. अरविंद हंगरगेकर | डॉ. शिवाजी शिंदे

कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन

प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी | डॉ. अरविंद हंगरगेकर | डॉ. शिवाजी शिंदे

स म ग्र प्रकाशन



कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन

( नव्वदोत्तरी साहित्याच्या विशेष संदर्भात )

प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख सेवा गौरव ग्रंथ

'कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन' या ग्रंथामधून १९९० नंतरच्या कालखंडातील मराठी कथात्म साहित्यातील विविध प्रवाह व प्रवृत्तींचा विविधांगी परामर्श घेण्याचा प्रयत्न आहे. मराठी भाषा व साहित्याचे साक्षेपी अभ्यासक डॉ. शिवाजीराव देशमुख यांच्या सेवानिवृत्तीचे औचित्य साधून हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. मराठी साहित्य विश्वातील मान्यवर अभ्यासक व समीक्षकांच्या लेखणीतून नव्वदोत्तरी साहित्याचा आलेख प्रस्तुत ग्रंथात पहावयास मिळेल. जागतिकीकरणानंतर समाजजीवनाच्या विविध क्षेत्रात जी परिवर्तने घडून आली, त्यात साहित्य व भाषेचे क्षेत्रही प्रभावित झाले. या प्रभावाचे भले – बुरे परिणाम चितारणाऱ्या कथा – कादंबऱ्यांची समीक्षा अभ्यासक व वाचकांसाठी निश्चीतच उपयुक्त ठरेल, याचा आम्हास विश्वास वाटतो.

*( संपादकीयमधून )*

₹ 300.00

स म ग्र प्रकाशन

*इथं अक्षरं बोलतात...*

9 788196 381134

**Kathatma Sahitya : Vimarsh aani Vivechan**
**( Navvadottari Sahityachya Vishesh Sandarbhat )**
**Prof. Dr. Shivajirao Deshmukh Seva Gaurav Granth**

**Sampadan - Principal Dr. Prashant Chaudhari,**
**Dr. Arvind Hangargekar, Dr. Shivaji Shinde**

**कथात्म साहित्य : विमर्श आणि विवेचन**
**( नव्वदोत्तरी साहित्याच्या विशेष संदर्भात)**
**प्रो. डॉ. शिवाजीराव देशमुख सेवा गौरव ग्रंथ**

**संपादन - प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी,**
**डॉ. अरविंद हंगरगेकर, डॉ. शिवाजी शिंदे**

प्रकाशक - देविदास बाळासाहेब पाटील
स म ग्र प्रकाशन
शिवछत्रपती नगर हडको वसाहत,
तुळजापूर ४१३६०१
मो. क्र. ८८८८१५०५०३
Mail - dasbpatil@gmail.com

मुद्रक : अक्षरमुद्रा, पुणे
मुखपृष्ठ : दास पाटील
अक्षरजुळवणी : नेताजी जावीर, धाराशिव
ग्राफिक डिझाइन : ए. ए. डिझाइन्स, धाराशिव

ISBN - 978-81-963811-3-4

© प्रा. सौ. कौशल्या शिवाजीराव देशमुख

४/१८, "राजमाची' विद्यानगर क्र.२,
सिव्हिल हॉस्पिटल जवळ,सोलापूर.-४१३००३
भ्रमणध्वनी-९४२३०६७२८०, ८८३०५०७०२०

पहिली आवृत्ती - बुधवार, दि. १२ जुलै २०२३

मूल्य - ₹ ३०० /-

(टीप : प्रस्तुत अंकातील विविध लेखांत व्यक्त झालेली मते ही त्या-त्या लेखकांची आहेत.
त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

२२) शिक्षणसंस्कृती मांडणारे आत्मकथन : 'न मेचता' ।प्रा.डॉ.कैलास देवराम सलादे ।१९१।
२३) गोमंतकीय मराठी कथांमधून जाणवणारे सांस्कृतिक परिप्रेक्ष । डॉ. विनय मडगांवकर ।१९७।
२४) 'तहान' मधील पाणीटंचाई आणि जीवन संघर्ष । प्रा. अनिलकुमार दडमल ।२०३।
२५) प्रतिभाशाली लेखिकेची संवेदनशील अभिव्यक्ती: 'दहा महिन्यांचा संसार' । प्रा.सुमती पवार ।२०७।
२६) अद्भुत विश्वाचा सृजनात्मक आविष्कार : शेवटची लाओग्राफ़िया । प्रा.डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी ।२०९।
२७) रकमा - पश्चिम महाराष्ट्रातील बोलीचा एक अस्सल दस्तऐवज । गणेश भाकरे ।२१३।
२८) मराठवाड्यातील शेतकऱ्यांचं भावविश्व साकारणारी कथाः 'वाडा जागा झाला' । डॉ. माधव जाधव ।२१८।
२९) ग्रामीण राजकीय पार्श्वभूमीवर हतबल शिक्षणव्यवस्थेच्या नोंदी घेणारा कथासंग्रह 'आलोक' । किरण शिवहर डोंगरदिवे ।२२३।
३०) मराठवाड्यातील समृद्ध कथावैभव । प्रा.डॉ.दीपक चिद्दरवार ।२२९।
३१) बुडत्या शेतकऱ्याला पिकतं करणारं ललित गद्य, 'मेळवण' । प्रा.डॉ.सुवर्णा गुंड-चव्हाण ।२३६।
३२) २००० नंतरच्या मराठीतील कथात्मक बाल साहित्याची वाटचाल । डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील ।२४४।
३३) हृद्य व्यक्तींच्या आठवणी - 'मर्मबंधातली ठेव ही' । प्रकाश रामचंद्र क्षीरसागर ।२४८।
३४) सन २००० नतंरच्या मराठी कादंबरीत आलेले कृषिजीवन । प्रा. डॉ. शंकर विभुते ।२५०।
३५) राजकारण आणि दुष्काळाची धग चितारणारी कादंबरी: धूळपावलं । डॉ.अनंता सूर ।२५९।
३६) मराठी साहित्य प्रवाहातील उच्च विचार कोटीच्या कथा ... प्रतिशोध । डॉ. युवराज पवार ।२७२।
३७) डॉ. श्रीकांत पाटील यांच्या ग्रामीण कादंबऱ्यातील जगण्याचे सूत्र ।सौ वंदना कुलकर्णी ।२७९।
३८) ग्रामीण भागाची उलथापालथ शब्दांकित करणारा; बाईचा दगड ।प्रा.डॉ.द्वारका गिते। ।२८३।
३९) मराठी विनोदी कथाप्रवाह समृद्ध करणारा कथासंग्रह: 'थट्टा मस्करी'। डॉ.अरुण ठोके ।२८७।
४०) शेताच्या मरणाची गोष्ट: एक आकलन । प्रा.डॉ.शिवाजी संभाजी गायकवाड ।२९६।

# मराठी विनोदी कथाप्रवाह समृद्ध करणारा कथासंग्रह: 'थट्टा मस्करी'

– डॉ.अरुण ठोके,
नाशिक, चलभाष : ९१७५१६४७९९

**प्रास्ताविक:**

डॉ.रवींद्र लक्ष्मीकांत तांबोळी यांच्या 'थट्टा मस्करी' या कथासंग्रहाचे पद्मगंधा प्रकाशन संस्थेने एप्रिल २०१९ मध्ये प्रकाशन केले आहे. कथासंग्रहाच्या शीर्षकातूनच हे सूचित होते की, यात विनोद आहे. स्वाभाविकच या विनोदी कथा आहेत.पुंडलिक वझे यांनी साकारलेले समर्पक मुखपृष्ठ, पुस्तकाची उत्तम बांधणी या गोष्टी प्रथमतः नजरेत भरतात.वाचनाची आवड जपणाऱ्या वाचकांना हा कथासंग्रह अर्पण करण्यात आलेला आहे. 'रुजुवात' ही स्वतः लेखकानेच स्वतःच्याच पुस्तकाला लिहिलेली प्रस्तावना ही बाबही लेखकाचेवेगळेपण प्रदर्शित करणारी आहे. स्वतःच्याचलेखनाकडे तटस्थपणे पाहण्याची वृत्ती व प्रस्थापित प्रस्तावनाकारांची शाबासकी टाळणे या दोन्ही बाबी यातून साध्य झालेल्या दिसतात. तांबोळींच्या याविनोदी कथा यापूर्वी दिवाळी अंकांतून व वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. मराठवाड्याच्या भौगोलिक व सांस्कृतिक पर्यावरणाचा खोलवर ठसा त्यांच्या व्यक्तिमत्वावर उमटलेला असल्याचे लक्षात येते. अठरा कथांच्या या संग्रहात संत, लग्न, वैवाहिक आयुष्य, आर्थिक प्रगती, संगीत, भांडवल, मुंबई, मूर्खांचे विचार, निमंत्रण पत्रिका, युवतीशी संवाद, तंत्रज्ञानाचा परिणाम, कविगणना, अशा विविध विषयांवरील कथा आहेत. या सर्व कथांच्या मुळाशी विनोद पेरलेला असल्याने त्यांची आशयसूत्रे विनोदाने भारलेली आहेत. या कथांच्या विशेषांची नोंद घेऊ.

**कथानक विशेष:**

रवींद्र तांबोळींच्या कथांतून व्यक्तींची, कृतींची, घटना–प्रसंगांची नेटकी निवड व जुळणी केलेली असल्याने त्यातील कथानक वेधक ठरते. विनोदाची पखरण करतांना वाचकांच्या मनात कुतूहल जागे करून त्यांची उत्कंठा वाढविण्याचे कसब लेखकाला अवगत असल्याने कथांतील कथानकाची रचना आकर्षकरित्या करण्यात आलेली आहे. 'मेकिंग ऑफ हायटेक बाबा: संत तांबुलनाथ' या कथेत संत तांबुलनाथांच्या भक्तिमार्गाचे कथानक नवख्या ढंगाने रंगविण्यात आलेले आहे. यात संत तांबुलनाथ व त्यांचे परमभक्त थंडा महाराज यांच्यातील संवादातून व तृतीय पुरुषी निवेदनातून कथानक साकारलेले आहे. मराठवाडा ही तांबुलनाथांची कर्मभूमी, मराठवाड्यातील लोकांचे स्वभाव विशेष व सामाजिक ओळखीच्या खुणांचे

विडंबन हा या कथेच्या कथानकातील गर्भित विनोद होय. यासाठी वक्रतेच्या तत्त्वाचाही अवलंब करण्यात आलेला आहे. कथेच्या कथानकातून मराठवाड्यातील माणसांची 'संथवृत्ती' ही भौगोलिक विशेष म्हणून नोंदविण्यात आलेली आहे. हे विनोदाचे कारण ठरते. उदाहरणार्थ, निवेदक म्हणतो की, इथे इतका संथपणा साचला आहे की, आजवर इथला कोणी निव्वळ आरंभशूर म्हणूनही प्रसिद्ध झाला नाही. असेही मानतात. यामागचे कारण म्हणजे, आरंभ कधी करावा आणि कशासाठी करावा या विचारातच इथले बहुसंख्य प्रजाजन आपले जगणे उरकून घेतात, असे गृहीतक मागे एका संथपंथी प्राध्यापकाने आपल्या व्याख्यानाद्वारे मांडले होते. असा दाखला मिळतो.[१] अशा संथवृत्तीतूनच अनुकरणशीलता वाढीस लागून 'गुरुआदेश हेच सत्य, बाकी जग मिथ्य आहे.' ही भावना जपणारे लोक भारतातील निरनिराळ्या बाबांचे अनुयायी झाले होते. ही बाब तांबुलनाथांनी त्यांच्या तारुण्यातच हेरली होती. तांबूलनाथांच्या घराण्याचा चातुर्यपूर्ण इतिहास कथन करण्यात आलेला आहे. तांबुलनाथांनी त्यांच्या भक्तांना विज्ञानाकडून श्रद्धेकडे व श्रद्धेतून स्वतःवरच्या अंधश्रद्धेत परावर्तीत करून घेवून स्वअर्थप्राप्तीचा नवा मार्ग शोधला होता. आपल्या भक्तांना भोगव्यवस्थापन शिकवून 'व्यसने नसतात कधीच वाईट/टेस्ट बाईट लाईट लाईट'अशी शिकवण देवून ते 'हायटेक बाबा' होण्यासाठी अथक परिश्रम घेतात.

तांबुलनाथांनी औरंगाबादच्या सिडको परिसरात भव्य बंगला भाड्याने घेवून 'इन द सर्च ऑफ इनोसन्स' ही मोहीम सुरु केली. या मोहिमेत थंडा महाराज हे व्यावसायिक भाबडेपणा राखणारे भक्त त्यांना मिळाले. तांबुलनाथ भक्तिमार्गाच्या व्यवसायाचे व्यवस्थापन करून फक्त आयकर भरणाऱ्या मंडळींचेच गुरु व्हायचे असा उपदेश थंडा महाराज या भक्ताला करतात. किंबहुना 'क्राईम, सेक्स, पॉलिटिक्स आणि ग्लॅमर या क्षेत्रांतील मंडळी जोपर्यंत आपल्या संप्रदायाचे गुणगान करीत नाहीत, तोपर्यंत आपली ही साधना सफल होणार नाही.' याची जाणीव करून देतात. मराठवाड्यात या चारही क्षेत्रांतील दिग्गजांची वानवा असल्याने तांबुलनाथ आपल्या संप्रदायाची जाहिरात विविध माध्यमांतून करतात.

थंडा महाराजांनी भक्तांना दिलेल्या अंधश्रद्धारुपी संकेतातील उपदेशांचे कथन करण्यात आलेले आहे. यानंतर तांबुलनाथांचे मुंबईचे भक्त रेतीचंद सिमेंटराम त्यांच्यावरील संकटाचे निवारण गुरु तांबुलनाथांनी केल्याचा समज होऊन ते तांबुलनाथांना इनोव्हा गाडी व एक बंद बॅगेत रोकड भेट देतात. या भारावलेल्या भक्ताचे 'प्रेम' म्हणून तांबुलनाथ त्यांच्या भेटवस्तूंचा स्वीकार करीत असल्याचे सांगतात. रेतीचंद सिमेंट रामला मोठी जेवणावळ देण्यास सांगून त्याच्यासाठी यज्ञयाग ठेवल्याचे कथन करतात. रेतीचंद भारावून होकार भरतो. तांबुलनाथ हा आपल्या चतुराईच्या जोरावर भक्तांची कशी फसवणूक करून हायटेक बाबा बनतो याचे खुमासदार संदर्भ या कथानकातून येतात.

'कहाणी एका राहून गेलेल्या लग्नाची' या कथेत अमित व त्याचा मामा या दोन मुख्य व्यक्तिरेखा आहेत. अमित जवळकरने लग्नाविना पंचेचाळीशी ओलांडली त्याचे एकमेव

कारण म्हणजे त्याच्या मामाने लग्नाबाबत अमितला दिलेले सल्ले होत. अमितला लग्न करण्याची इच्छा होती. लग्न करण्यासाठी अनेक मुली बघूनही प्रत्येकवेळी त्याचा मामा काहीना काही खोट काढत असे. अमितच्या मामाला अविवाहित राहण्याचा अस्सल अनुभव असल्याने तो असे करीत असे. आपल्या भाच्याची मानसिकता लग्नविरोधी घडविण्याच्या वृत्तीमुळे अमितचे मित्र त्याच्या मामला 'ब्रॅकेट मामा'म्हणत असे. कारण कंस मामा म्हणजे कंसाचा अपमान केल्यासारखे होईल, असे त्यांना वाटे. मामाच्या स्त्रीविषयक विचारांचा जबरदस्त प्रभाव अमितवर असल्याने एकदा एस. टी. प्रवासात शेजारी बसलेल्या महिलेचा (दोघांत ब्रीपकेस असतांना) एक-दोनदा हलका धक्का लागला तेव्हा त्यानेच या महिलेने माझा विनयभंग केला म्हणून टाहो फोडला. त्याच्या या सात्त्विक टाहोला घाबरून संबंधित महिलेने तिची चूक झाली असे सांगून क्षमा मागितली. या प्रसंगनिष्ठ विनोदातील अतिशयोक्ती वाचकांच्या हास्याचे कारण ठरते. मुंबईच्या पोरी घाई करून जन्म वाया घालवणाऱ्या, ठाण्यातल्या उदासवाण्या, रायगडाच्या शूरवीर शब्दांचा तीर थेट काळजात मारणाऱ्या, सिंधुदुर्गच्या इस्टेटीत वाटा मागणाऱ्या नाशिकच्या देवभोळ्या, उपवास करायला लावणाऱ्या आदी अनेक शहरांतील मुलींची वैगुण्ये सांगून अमितचा मामा त्याचे लग्न जमू देत नसे. कथेच्या शेवटी अमितचा मामा गावाला गेल्याचे बघून अमित मद्यपान करून झोपतो. कातरवेळी जागे झाल्यावर त्याच्या उशाशी यकम्मा ही मोलकरीण येते. अमितने तिला आयुष्यभर पोसण्याची हमी मागते. त्या बदल्यात त्याच्या दैनंदिन गरजा पुरविण्याचे आश्वासन स्वतःहून देते. अमित ते स्वीकारतो. लग्न न करता लिव्ह इन रिलेशनशिपचा फायदा अमितला मिळवून देण्यात त्याचे नशीब यशस्वी ठरते. मात्र या गिफ्टमध्ये यकम्माच्या दोन मुली, दोन जावई, एक नातू असे वन प्लस फाईव्हचे कुटुंबवत्सल पॅकेज लाभते.

नैतिक शिकवणीचा अतिरेक व विक्षिप्त मामाच्या कृत्यांना वैतागून आधी महिलेच्या स्पर्शाने विनयभंग झाला म्हणणारा अमित यकम्मा या थोराड स्त्री समवेत लग्नाशिवायचे कुटुंब थाटतो. या दोन कृत्यांतील विसंगती या कथेतील विनोदाचे सौंदर्य वाढवते. 'ब्रॅकेट मामा' ही बिरुदावलीही खास होय.

'मन्मथरावांचे अनुकरणीय वैवाहिक आयुष्य' व 'थोर आंबटशौकीन नारायणराव: एकजीवनशोध' या दोन कथांतून बदफैली जीवनशैली अंगिकारलेल्या पुरुषांच्या जीवनाचे चित्रण करण्यात आलेले आहे. मन्मथराव हे उच्च मध्यमवर्गीय शासकीय अधिकारी. 'महिलांचा विकास म्हणजे बालकांचा जन्म' हे सूत्र त्यांनी रुजू होताक्षणी ठेवल्याने कटाक्षाने त्यांच्या अधिकारातल्या कोणत्याही महिलेचा ते गैरविकास होऊ देत नसत. त्यामुळे बालकांचा जन्मही आटोक्यात राही आणि गुल ते गुलस्तान होणे टळे.[२] हे निवेदन मन्मथरावांच्या अश्लिल कारस्थानांचा भांडाफोड करणारे आहे निवेदकाने योजलेल्या खेळकर शैलीमुळे त्यातील उपहासही सूचकतेने आलेला आहे. कथेतील निवेदक मन्मथरावांना त्यांच्या सुखी व यशस्वी जीवनाचे रहस्य कथन करण्यास सांगतो. मन्मथरावांनी केलेल्या भ्रष्ट आचरणाचे

रसभरीत संदर्भ, त्यामागील चातुर्यासहित ते सांगतात. तर नारायणराव समकालीन राजकीय न-नैतिकतेचे जतन करणारा गृहस्थ होय. कथेच्या शीर्षकातच थोर आंबटशौकीन हे विशेषण आहे. घरगड्याच्या पत्नीवर वक्रदृष्टी ठेवणारा नारायण तिचा गैरफायदा घेतो. कुमार वयातच दोन मुली त्याच्या वासनेच्याशिकार होतात. एक-दोघींनी त्याचा प्रतिकार करताच त्याने त्यांच्यापुढे साक्षात लोटांगण घालून त्यांची क्षमाही मागितली. असे हे नारायणराव ग्रामपंचायतीत बिनविरोध निवडून येतात. पुढे तालुकास्तरावर राजकीय नेतृत्व म्हणून मान्यता पावतात. नारायणरावांचे विकासविषयक विचारही वाईटच. उदाहरणार्थ, जोपर्यंत विकास चालू राहणार आहे तोपर्यंत भ्रष्टाचार जिवंत राहणार आहे. भ्रष्टाचार संवर्धनासाठी प्रेमळ, मायाळू आणि कशाचाही आग्रहाने स्वीकार करायला लावणाऱ्या महिलांची खरी निकड राहणारच आहे. विकासाची प्रक्रिया निरंतर असते, भ्रष्टाचार जिवंतच राहतो आणि कोणताही श्रेष्ठ हा राजप्रतीक असल्याने राजालाजे अष्टभोग ठरवून दिले आहेत त्याचा तो भोग घेतो. या भोगातील महत्त्वाचा भोग तर अनिवार्य असतो, त्याला शय्याभोग म्हणतात.[३] राजकीय सत्तेत असतांना स्त्रियांच्या शोषणाचे आंबटशौकीन समर्थन करणारा नारायणराव हा समकालीन राजकीय व्यवस्थेतील भ्रष्ट नेतृत्वाचे प्रातिनिधिक चित्रण होय.

'जे जे हरवले आजवरी' या कथेत प्रसिद्ध आनंदबुवा या कीर्तनकाराच्या जीवनातील आसक्तीचे अनेक दाखले स्वतः बुवाच देतात. चरित्रहीन माणसे धार्मिक क्षेत्रात समाजाचे मार्गदर्शक म्हणून कसे पुढे येतात याचे उपहासात्मक कथानक रंगविण्यात आलेले आहे. या कथासंग्रहातील प्रथम पुरुषी निवेदनातील कथांची कथानकेही स्वाभाविकपणे विनोदाची पखरण करणारी आहेत. 'आमच्या कटू संगीतमय आठवणी' या कथेत संगीत ऐकून निवेदकाच्या आयुष्यात घडलेल्या गंमतशीर घटितांची चमत्कृतीपूर्ण योजना करण्यात आलेली आहे. निवेदकाचे राजदूतवरील तबलावादन ही कृती या कथेतील विनोदनिर्मितीचे कारण ठरते. तो प्रसंग वाचकांच्या आवर्जून लक्षात राहण्यासारखा आहे. अशाच 'मुंबई दर्शन, रोग निर्मुलने...', 'एक उत्तम मूर्खाचे विचार' व 'निमित्तनिमंत्रण पत्रिकेचे' आदी कथांची कथानके व्यक्ती, प्रसंग व शब्दनिष्ठ विनोदाने भरलेली आहेत.

**अनोख्या निवेदन तऱ्हा:**

कोणत्याही कथेत निवेदन असते तसे 'थट्टा मस्करी'तही आहेच. प्रथम पुरुषी व तृतीय पुरुषी अशा दोनही प्रकारच्या निवेदनाच्या अनोख्या तऱ्हा या कथांतून अनुभवला येतात. घटना-प्रसंगांच्या कथनातील सातत्य व तार्किकता यांचे खेळकर संतुलन साधत साकारलेली पात्रे व संवाद सेंद्रिय वाटतात. मानवी मनाचे खेळ, भ्रष्टवृत्तीसाठी अवलंबलेल्या क्लृप्त्या निवेदनातील उपहासातून प्रकट होतात. यासाठी लेखकाने योजलेल्या शैलीचे वेगळेपण चटकन नजरेत भरते. उदाहरणार्थ, तृतीय पुरुषी निवेदनातून तांबुलनाथांचा परिचय करून देणारे हे निवेदन पहा ऐतिहासिक दाखल्यानुसार तपासले तर तांबुलनाथांच्या घराण्याचा मूळ प्रदेश हा मराठवाड्यातीलच परभणी जिल्ह्यातील जिंतूरनामक परिसर होता. जिंतूर

परिसरातील तालुक्याचे नाव मानले गेलेले जिंतूर हे शहर संपूर्ण महाराष्ट्रातील एक अग्रस्थानाचे उलटे शहर मानायला हवे. कारण इथे जी नदी वाहत असते, त्या नदीला सारे जण 'उलटी नदी' म्हणून ओळखतात. ही एक अशी विशिष्ट नदी आहे, जी आजही उतारा ऐवजी चढाकडे प्रवाही असावी. या नदीकडे आज जर कोणी पहिले, तर त्याला केव्हाही उलटी होऊ शकते आणि पारंपरिक शोध घेतला, तर इतिहासात पूर्वी येथे गावोगावच्या अनेकींनी कोरड्या उलट्या केल्या होत्या, असेही एक तथ्य सापडू शकते. या नदीत भर पावसाळ्यातही पाणी नसलेले आजही पाहायला मिळते.[४]

प्रस्तुत निवेदनातील चमत्कृती हा विशेष ठळकपणे जाणवतो. तसेच 'उलटी' नदीविषयी मांडलेले तर्क निवेदनात खुमासदारपणा आणतात. नदीचे उलट दिशेने वाहणे, नदीकडे कुणी आज पहिले तर त्याला केव्हाही उलटी होईल या छोट्याशा वाक्याच्या योजनेतून नदीच्या पात्रात ग्रामीण भागातील लोकांच्या शौचास बसणे या कृतीकडे लक्ष वेधले आहे. हागणदारीमुक्त गाव योजना सारख्या योजना कशा कागदावर राहून जातात याचीही सूचक जाणीव या निवेदनातून करून देण्यात आलेली आहे. उलट दिशेने वाहणाऱ्या व सदैव कोरड्या राहणाऱ्या नदीच्या स्वभावाचे विशेष संस्कार तांबुलनाथांच्या व्यक्तिमत्वावर पडलेले असल्याने तांबुलनाथही विपरीत वागणारी मुख्य व्यक्तिरेखा म्हणून कथेचा नायक बनून येतो.

'आपण म्हणजे हास्ययोग कारण' ही कथा प्रथम पुरुषी निवेदनातून साकारलेली आहे. यातील निवेदकाने स्वतःचेच लग्न जुळवताना तटस्थपणे केलेले वर्णनपहा,आम्ही त्या काळात तारुण्यात होतो. विवाहोत्सुकाही होतो. चांगली पदवी असूनही निव्वळ नोकरी नसल्याने आमच्या सेल्फ प्रोडक्टची लोकप्रियता 'नवरदेव' म्हणून विशेष नव्हती. तसे आम्ही सुरक्षित बेकार होतो आणि गध्येपंचविशीत होतो. आमची ही व्यक्तिगत माहिती आमच्या आजच्या श्वशुरांना कोणी पुरवली होती कोण जाणे? ही माहिती त्यांना प्राप्त होताच त्यांनी आम्हाला त्यांची मुलगी दाखवायचा कट रचून टाकला. त्यांची उपवर कन्या म्हणे त्यांच्या गावात मायाळू आणि प्रेमळ म्हणून अतिशय लोकप्रिय होती. कोणाचाही कोणताही आग्रह ती नाकारत नसे, असाही प्रवाद होता.[५]

प्रस्तुत निवेदनात निवेदकाने स्वतःसाठी 'मी' ऐवजी 'आम्ही' हे आदरपूर्वक संबोधन योजणे, नवरदेव म्हणून लोकप्रियता नसणे म्हणजे बेरोजगार असणे मात्र तोही 'सुरक्षित' बेकार असणे या परस्पर विरोधी गोष्टींतून निर्माण झालेली विसंगती हास्याचे कारण ठरते. 'मुलगी दाखविण्याचा कट रचणे' यासारख्या वाक्यप्रयोगातून सदर इसम लग्न या गोष्टीकडे कसे पाहतो आणि तो असे का म्हणतो, हे या निवेदनातील इप्सित मायाळू, प्रेमळ व लोकप्रिय कन्येच्या वर्तनावरून समजते. प्रस्तुत निवेदनातून साकारणाऱ्या विनोदासाठीचा सुसंगत तर्क व कल्पकता यांचा अनोखा संगम येथे प्रत्ययाला येतो. लग्नमुहुर्ताविषयीचेहे भाष्य पहा, भर वैशाखातील मे महिन्यातील पहिल्या रविवारी आमच्या विवाह सोहळ्याची तिथी सासऱ्याने काढली होती. मराठवाड्यातील शाश्वत पाणीटंचाईवर तोडगा म्हणून आम्हाला

तीव्र उन्हाळ्यातील पंचेचाळीस अंश तापमानात घोड्यावर बसवून भर उन्हात तास-दीड तास घोड्यावर फिरवून आमचा बळी द्यायचे नियोजन होते की काय, याचे स्पष्टीकरण मिळाले नाही; परंतु आम्ही चिवट आणि निर्लज्ज असल्याने तेव्हा सनस्ट्रोक टाळून जिवंत राहिलो होतो. आजही आम्ही जगतो आहोतच.[६]

आत्मटीकेतून साकारलेल्या या विनोदी निवेदनाला सामाजिक प्रश्नांची झालर सहजपणे उलगडून येते. मानवी व्यवहार, समाज-संस्कृती विषयीची निरीक्षणे उपहासात्मकरित्या निवेदनाचा अविभाज्य भाग म्हणून येतात. 'मुंबई दर्शने, रोग निर्मुलने' या कथेतील इसम खेड्यातून मुंबईत आल्यावर त्याला मुंबई कशी अनुभवला येते याचे खोडकर शैलीतील निवेदन पहा, महिलांच्या पन्नास टक्के वाट्याप्रमाणे त्यातून एक-दोन हजार नोकरदार महिलाही उतरलेल्या असतातच. हे दृश्य आयुष्यात पहिल्यांदाच पाहणाऱ्या प्रत्येक इसमाचे डोळे त्या हजारो सुंदर, तरतरीत महिलांना पाहून विस्फारून जातात. त्याच्या दृष्टीला सारे जग हे हजार दोन हजारपट सुंदर सुंदर दिसून जाते. आपल्या गावातील महिलांमधले न्यून त्याला स्पष्टपणे जाणवते. 'ब्युटी लीव्हस इन सिटी' हेही त्याला जाणवते, तर डोळे फाडून फाडून त्याने हे अवर्णनीय दृश्य पाहिल्याने त्याच्या डोळ्यातला दृष्टीदोष खाड्कन निघून जातो.अल्पदृष्टी जावून दिव्यदृष्टी येते. त्याची वाईट, तिरपी नजरही सरळ,साफ होऊन जाते. जग सुंदर असते ही जाणीव झाल्याने, जीवन आनंदीच आहे हा आशावाद जागा होऊ लागतो. आणि त्याची नकारात्मक मनोवृत्ती असली तर ती सकारात्मक होऊन जाते. हे फक्त मुंबई दर्शनाच्या पहिल्या झटक्यात घडते आणि त्याचे आपोआपच मुंबईत मन रमणे सुरु होऊन जाते.[७]

खेड्यातील माणसाला मुंबई शहराविषयी असलेले आकर्षण व त्याच्यावर झालेल्या या शहराच्या परिणामांचे कथन अतिशयोक्तिपूर्णरित्या करण्यात आलेले आहे. खेडुताच्या दोषांचे निर्मुलन हा रंजनाचा केंद्रबिंदू बनतो. निवेदनातील मोठी वाक्ययोजना वाचकाची उत्कंठा वाढविण्यासाठी कारणीभूत ठरते.

**भाषा व शैलीविशिष्टता:**

'थट्टा मस्करी' या कथा संग्रहातील कथांच्या वाचनातून एक वेगळीच अनुभूती येते, ती त्यातील भाषेच्या वैशिष्ट्यपूर्ण वापरामुळे. ही भाषा नित्य व्यवहाराच्या भाषेतून घडवलेली परंतु खास 'तांबोळी' शैलीचा ठसा वाटावी अशी आहे. कथांतील भाषेतून सुभाषितवजा रचना, विनोदी उक्ती, नवीन शब्द घडविण्याची लेखकाची हातोटी, हिंदी व इंग्रजी भाषेतील शब्द व वाक्यांचे अर्थपूर्ण उपयोजन, दीर्घ वाक्ययोजना, काव्यात्मकता, विडंबन, तिरकसता,पत्रलेखन व निबंध लेखन तंत्राचा कथेच्या रुपबंधात उपयोजन व अलंकारिकता आदी शैली विशेष यामुळे या कथा समकालीन ठरतात. उदाहरणार्थ, कथेची ही सुरुवात पहा.

गुगल ब्रम्ह, गुगल विष्णू
गुगल देवो महेश्वरा

गुगल साक्षात परब्रम्ह
तस्मै श्री गुगलै नमः

अतीव श्रद्धेने तांबुलनाथ महाराजांनी आपल्या संगणकासमोर डोळे मिटून हे 'गुगल स्तोत्र' म्हटले आणि कृतार्थ भावनेने ते डोळे उघडते झाले.[८]

'मेकिंग ऑफ हायटेक बाबा: संत तांबुलनाथ' या कथेच्या कथानकाचा आरंभ करण्यासाठी योजलेले गुगल स्तोत्रधार्मिक व्यवस्थेवरील तणावाच्या प्रकटीकरणासाठी येते. 'हायटेक बाबा' होण्यासाठी समकाळातील संतांनी अंगिकारलेल्या इंटरनेट या माध्यमाचा प्रभाव, गुगलसारख्या सर्च इंजिनचा ज्ञानप्राप्तीसाठीउपयोग करून घेणे व त्यालाच आपला सर्वेश्वर मानणे म्हणजे संत जी परंपरा मानतात, ज्या मूल्यांच्या आधारे ते अनासक्त जीवनमार्ग अवलंबतात तोच सोडून देणे होय. वरवरच्या थिल्लर ज्ञानमार्गाचा अवलंब करणे, गुगललाच ईश्वर मानणे म्हणजे सांस्कृतिक आत्मविनाशाचा मार्ग अनुसरून आपली 'ओळख' पुसून टाकण्यासारखे कृत्य होय. समकाळातील हायटेक बाबा ही गोष्ट करीत आहेत,या वास्तवाकडे यातून लक्ष वेधण्यात आलेले आहे. समाजात अंधश्रद्धा रुजविणाऱ्या थंडा महाराजांनी सांगितलेले सुवचन पहा,

ऐका गुरवर्य की,
मार्जार वेढ पडला तर
कुक्कटबळी द्यावा
विव्हळतेश्वान ऐकून तर
बोकुडच हादडावा
पाहिले घुबड दारी तर
मत्स्य तळून भक्षावा
हीचमात्रा अशुभावरची
हाच उपाय मानावा![९]

यासारख्या काव्यात्मक उपदेशातून थंडा महाराजांच्या पंथ प्रसाराच्या प्रयत्नांमुळे वाचकांना हसू आल्याशिवाय राहत नाही. गुरु उपदेशाप्रमाणे जीवनमार्ग अंगिकारणाऱ्या भक्तांच्या आंधळेपणाकडे निर्देश करणे, हा हेतू अशा प्रकारची भाषा कथेत योजण्याचे कारण ठरते. भोगलालसा अतितीव्र झालेल्या काळातील उतावीळ भक्तांसाठी तांबुलनाथांनी केलेला उपदेश असा आहे,

व्यसने नसतात कधीच वाईट
टेस्ट बाईट/लाईट लाईट[१०]

भक्तीमार्गातील उथळपणाचे, वाईट साईट गोष्टींचे विडंबन करणे हा गर्भित हेतू अशी भाषाभिव्यक्तीयोजण्यामागे आहे. चिल्ड संप्रदाय, ब्रॅकेट मामा, इन द सर्च ऑफ इनोसन्स असे अनेक नवीन शब्दप्रयोग या कथांतील भाषेतून योजण्यात आलेले आहेत. 'दे रे हरी

पलंगावरी/ माझा मोबाईल व्हायब्रेशन वरी', 'गुरु आदेश हेच सत्य, बाकी जग मिथ्य आहे', 'रिकामे जे डोके, ते झोप घेण्या सोके', 'लावण्यवती कन्येची माता ही खरी भांडवलदार होय!', 'कर्तृत्ववान मुलाचा दरिद्री बाप म्हणजे दिवाळखोर भांडवलदार होय', 'ब्युटीलिव्हज इन सिटी', 'वाईट वळणाची वाट अर्थात डब्ल्यू.डब्ल्यू.डॉट.कॉम.', 'गंजबुद्धी भक्तोत्तम', 'अस्सल प्राशकांची नाळ जुळलेली', 'कल कमाव और बाद मे आव', 'प्रतिमा समाजघटकांत' 'फेयर अड लव्हली होऊन जाणे' खिसा सदोदित लाईटवेट होणे, मल्टीमार्केटिंगमुळे आसक्ती विरक्तीकडेजाणे, बनोंगे बराबर करोडपती (BBC) योजना, कवींसाठी उदास, भकास, शिखर, तळ, पुरस्कृत, तिरस्कृत, बेफाट, सुसाट, अनुदानित, विनाअनुवादित, शीघ्र, संथ, शासकीय, अशासकीय, प्रायोजित, वातापी, संतापी, बैठे, उभे, अचाट, पुचाट, मान्य, अमान्य, उल्लेखित, अनुल्लेखितकवी अशा तऱ्हेवाइक मानवी वृत्तींचे दिग्दर्शन अत्यंत कमीत–कमी शब्दांत तांबोळी सहजपणे करून जातात. लेखकाने कमावलेली भाषा वेधक आहे. लेखकाचे असलेले विपुल वाचन, शास्त्राभ्यास व लोकव्यवहाराचे सूक्ष्म बदल नोंदविणारी निरीक्षणशक्ती अशी वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैली कथांतून घडविण्यासाठी उपकारक ठरलेली आहे. म. फुलेंच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथातील विद्येच्या अभावाने झालेल्या हलाखीची कारणमीमांसा करणारी कविता ग्रंथारंभी आहे. त्याचेही रोचक विडंबन करण्यात आलेले आहे. मुंबईतील चौरासियाच्या तोंडाची हिंदी भाषा, कथा लिहिण्यासाठी अवलंबलेला पत्रशैलीचा नमुना, जणगणनेप्रमाणे कविगणना करण्याची अभिनव कल्पना व त्यातून साकारलेला कथाबंध मराठी कथेच्या इतिहासात प्रयोगशील आहे. यासाठी अवलंबलेली उपहासात्मक शैली, त्यातील तिरकसता तांबोळींचे कथालेखन वेगळे होण्यास कारणीभूत ठरते. हे सर्व या कथांतील विनोदाला पोषक म्हणून येते. कथांतील वैचारीकतही स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे.

**समारोप:**

'थट्टा मस्करी' या विनोदी कथा संग्रहातील कथांच्या अभ्यासातून जाणवलेले विशेष एका मर्यादित अवकाशात मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात करण्यात आलेला आहे. याकथांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) बहुतांश कथा या धार्मिक वास्तवाचे विडंबन करणाऱ्या आहेत.

२) वैयक्तिक विनोदानुभूतींचे प्रदर्शन हा यातील निवेदनाचा खास विशेष आहे.

३) संत चित्रण व निवेदकाचे स्वतःचे जीवनविषयक चिंतन व चित्रण अपारंपरिक स्वरुपात करण्यात येते त्यामुळे अनेकदा ते हास्याचे कारण ठरते.

४) पैसाकेंद्री व सुखोपयोगी जीवनशैलीची रेवडी उडवणे हे तांबोळींच्याकथांतील आशयसूत्र समकालीनता व व्यापकतेचा प्रत्यय देणारे आहे.

५) लेखकाने कमावलेली भाषा व शैली या कथांच्या वाचनातून वाचकांच्या प्रत्ययाला येते. हे या कथांचे सौंदर्य होय.

६) अनेकदा 'बौद्धिकता' हा विशेष असलेला विनोदही असामान्यीकरणातून सामान्यीकरणात सहजपणे आणण्यात येते. विनोदाला तर्क, संस्कृतीविषयक विचार, व्यवहार आदींचे संदर्भ स्वाभाविकपणे प्राप्त करून दिल्याने या कथांतील 'विनोदी बौद्धिक जाणीवा'अनुभवने हा निराळाच आनंदानुभव वाचकांना समृद्ध करणारा ठरतो.

७) या कथांतील स्त्री-चित्रण पारंपरिक विनोदी दृष्टीने येते.

८) विनोद हा या कथांचा आत्मा असल्याने मराठी विनोदी कथेच्या प्रवाहाला 'थट्टा मस्करी' तून नवसंजिवनी प्राप्त झालेली आहे.

थोडक्यात विनोदाची दीर्घकाळ टिकणारी रेंज असलेला कथाकार म्हणून रवींद्र लक्ष्मीकांत तांबोळींचे विनोदी कथालेखन आश्वासक आहे. 'थट्टा मस्करी' हा मराठी विनोदी कथेच्या प्रवाहाला अधिक समृद्ध करणारा कथासंग्रह आहे.

**संदर्भ:**

१) रवींद्र लक्ष्मीकांत तांबोळीं, थट्टा मस्करी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्र. आ. एप्रिल २०१९, पृ.१४

२) रवींद्र लक्ष्मीकांत तांबोळीं, उ. नि. पृ.३४

३) तत्रैव, पृ.५४

४)तत्रैव, पृ.१५

५)तत्रैव, पृ.७५

६)तत्रैव, पृ.७६

७)तत्रैव, पृ.८४

८) तत्रैव, पृ.१३

९)तत्रैव, पृ.२१

१०) तत्रैव, पृ.१७